दि. १३.०२.२०१७

# महापूर मध्ये मतदार जनजागृती रॅली संपन्न

लातूर - १६ फेब्रुवारी २०१७ मध्ये होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे.मतदान करताना कोणत्याही अमिशाला बळी न पडता निर्भिडपणे जाती, धर्माचा विचार न करता योग्य त्या उमेदवारास मतदान करुन लोकशाहीमध्ये आपण सार्वभौम असल्याचे सिध्द करावे. या हेतुने मौजे महापूर ता.जि.लातूर येथे रॅली काढून दयानंद कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मतदारामध्ये जागृती केली.

"मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो ", " आपले मतदान, लोकशाहीची शान " यांसारख्या घोषणा देत महापूर वाशीयांना मतदान करण्यासाठी प्रेरीत केले. सदरील उपक्रमामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. बिसेन, स्वा.रा. ती. म. विद्यापीठ, नांदेडच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सल्लागार समितीचे सदस्य डॉ. संतोष पाटील, कार्यक्रमाधिकारी प्रा. संदीप जगदाळे व राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी प्रतिनिधी गोपाळ तुरूप व विद्यार्थिनी प्रतिनिधी कु. स्नेहा चामले , विद्यार्थी बालाजी कांबळे, गोविंद कांबळे, अलिफ शेख व महाविद्यालयातील विद्यार्थी स्वयंसेवक उपस्थित होते.

---